■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २७० ■ बुधवार दि.१८ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 270 ■ Wednesday Dt.18 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# गेवराईत छत्रपती मल्टीस्टेट बँकेने घेतला एकाचा बळी, लेकीच्या लग्नासाठी ठेवीचे पैसे मिळेनात चकरा मारून थकलेल्या बापाचं टोकाचे पाऊल

## बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा गेवराईचे बँकवाले माजले दहशतीखाली ठेविदारांच्या जीवाची राख रांगोळी झाली?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




# गेवराईच्या पुढाऱ्यांना लोकांची मतदानापुरती गरज आहे का? पंडित-पवारांनी खातेदारांच्या व्यथा का ऐकून घेतल्या नसतील?


## लेकरा बाळाचा बाप हिरावून घेणाऱ्या संतोष भंडारी यांना देव सुद्धा माफ करणार नाही

- ■ छत्रपतीचा चेअरमन संतोष भंडारी याने अखेर तोंडकाळे केलं, कोणत्या राजकीय वरदहस्त्यांचे बळ?
- ■ बँकेच्या गेटवरच बापाची आत्महत्या; मुलीच्या लग्नांचे स्वप्न उद्ध्वस्त?
- ■ भंडारीच्या नावे करोडो रुपयांची संपत्ती असताना खातेदारांना वेटीस धरण्याचे काय कारण?













गेवराई । प्रतिनिधी
खासगी बँकेच्या त्रासांला कंटाळून खळेगाव ता. गेवराई जिल्हा बीड येथिल एका ठेविदांराने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. छत्रपती मल्टीस्टेट या शाखेसमोर गळफास लावून आपले जीवन संपवले आहे. आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शहरातील जुने बस स्टॅन्ड समोर ही दुर्दैवी घटना घडली असून त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गेवराई येथील छत्रपती मल्टीस्टेट या ठेविदारांला पैसे देण्यास शाखेकडून टाळाटाळ होत असल्याने खळेगाव (ता.गेवराई) येथील खातेदार सुरेश आत्माराम जाधव वय वर्ष, ४० यांनी खाजगी बँकेच्या समोर गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेमुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली असून खाजगी बँक प्रशासन खडबडून जागे झाले आहेत. सविस्तर वृत्त असे की छत्रपती मल्टीस्टेट गेवराई येथे अकरा लाख रुपये. अडकले असताना, शाखेत वारंवार चेकरा मारून व्याकूळ होऊन मानसिक तणावाखाली आल्याने सुरेश जाधव यांनी छत्रपती मल्टीस्टेट गेवराईच्या गेटला फाशी घेतली, ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये पाच लाख रूपये व छत्रपती मल्टीस्टेट मध्ये आकरा लाख रूपये ठेव ठेवल्याने व आता मुलीच्या लग्नासाठी पैश्याची तजबीज व्हायला हवी म्हणून सतत बँकेत वारंवार चेकरा मारत होते. मयत ठेविदार

पान २ वर

### ठेविदारांची आत्महत्या होण्यापूर्वी श्री.मंगलनाथ मल्टिपल निधीच्या केशव पंडितला तात्काळ अटक करा?



मागील तीन महिन्यापासून फरार असलेला मंगलनाथ मल्टिपल निधी चा चेअरमन केशव पंडित वेड्याचे नाटक करून फरार आहे. चेअरमन फरार असल्यामुळे ठेवीदार व सोनेतारण ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. आपले सोने व ठेव रक्कम परत कधी भेटेल यांना माहितीच नाही. व त्यांनाच माहित नाही की आपले सोने या चेअरमनने जिल्ह्याबाहेर व जिल्ह्यातील काही बँका व प्रायव्हेट सोनाराकडे जास्तीची रक्कम घेऊन घाण ठेवलेले आहे यात त्यांचे लाडके मेव्हणे प्रशांत शेलार, यांचा हात असल्याचे बोलले जात असुन त्यांना फरार करण्यास माहिर असणारे म्होरके किरण महामुनी, भागवत दीक्षित, प्रवीण शेलार, बहिण सुनिता प्रशांत शेलार यांच्यावर एपीडीआय कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी ठेविदारांकडुन होत आहे तरी या कोट्यावधी सोनेतारणाचा व ठेवीदारांचा प्रश्न निकाली काढण्यासाठी पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर या चेअरमनला व संचालक मंडळाला ताब्यात घेऊन याची चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच येणाऱ्या काळात ठेवीदारांची आत्महत्या होण्यापूर्वीच चेअरमन केशव पंडीत यांना पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## ग्रामपंचायतमध्ये बोगस कामे करण्यासाठी निवडी हे कटकारस्थान असल्याचे प्रकार

### गेवराई तालुक्यातील ग्राम रोजगार सेवक यांच्या नियमबाह्य निवडी रद्द कराव्यात




गेवराई । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यात काही ग्रामपंचायत मध्ये अतिरिक्त ग्रामरोजगार सेवक म्हणून नियमाबाह्य निवडी झाल्या आसून त्यांना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (–झज) यांनी त्यांना आयडी पासवर्ड दिला आहे. ग्रामपंचायत मध्ये बोगस कामे करण्यासाठी निवडी हे कटकारस्थान असल्याचे दिसून येत आहे. सदरील निवडी ह्या कुठल्याही नियमात बसत नाहीत कारण अतिरिक्त ग्रामरोजगार सेवक निवड करण्याचा शासनाचा शासन निर्णय आहे त्यामध्ये सुद्धा शासनाने शुद्धिपत्रक काढलेले आहे. सदरील शासन निर्णय हा शासनाच्या संकेतस्थळावर दिसून येत आहे परंतु गेवराई पंचायत समिती या शासन निर्णयाच्या अंमलबजावणी करताना दिसून येत नाही. तसेच तालुका संघटनेकडून वारंवार याबाबत गटविकास अधिकारी यांच्याकडे या नियमबाह्य ठरावाच्या अनुषंगाने लेखी / तोंडी तक्रारी केलेल्या आहेत.
तरी ही संघटनेला कसलाही सकारात्मक प्रतिसाद न देता ग्रामपंचायती कडून कडून आलेल्या ठरावा ची शाहीनशा न करता मान्यता देत आहेत तरी गटविकास अधिकारी यांच्याकडून संघटनेला कसलाही सकारात्मक प्रतिसाद न देता ग्रा.प. कडून आलेल्या ठरवावर योग्य ती प्रोसिजर करून सदरील ठरावावर

पान २ वर

## महाराष्ट्र आधार सेनेच्या शाखा स्थापनेला धुमधडाक्यात सुरवात, जिल्ह्यामध्ये अनेक शाखांचे नियोजन सुरू

# बीड जिल्ह्यातील दिनदलित शोषितांना न्याय मिळवून देण्यासाठी व जातीयवादाच्या विरोधात महाराष्ट्र आधार सेना लढा उभारणार : दिपक थोरात



वडवणी । प्रतिनिधी
महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष व सांज दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक दीपक भाऊ थोरात यांनी महाराष्ट्र आधार सेनेचा उद्घाटन सोहळा मोठ्या थाटात संपन्न केला व या सोहळ्याला उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देऊन एक प्रकारे या संघटनेला आधार दिला आता या संघटनेमुळे महाराष्ट्रातील दिनदलित शोशितांना आता मात्र खंबीर आधार मिळाला आहे आजपर्यंत अनेक सामाजिक राजकीय संघटना दलित समाजातील बांधवांनी काढल्या परंतु संकटकाळी मात्र फार कमी संघटनेने अन्याय झालेल्या लोकांना आधार दिला परंतु आता महाराष्ट्र आधार सेना अन्याय विरोधात लढणार आहे.
ना जातीचा ना धर्माचा एक मदतीचा असे ब्रीदवाक्य घेऊन संघटना आता गोरगरिबांना सर्व जाती धर्मातील घटकांना सोबत घेऊन काम करणार आहे तसे पाहिले तर दीपक (भाऊ ) थोरात यांनी आजपर्यंत आपल्या आयुष्य समाजकार्यात घातले आहे आता इथून पुढे ते समाजाला न्याय देण्यासाठी झटणार असल्याचे त्यांनी सांगितले उद्घाटन सोहळ्याला हजारो कार्यकर्ते स्वखर्चाने उपस्थित राहिले नाहीतर एखादा कार्यक्रम ठेवायचा म्हटलं तर पैसे देऊनही लोक येत नाहीत परंतु काही न देता लोक आपल्या स्वतःच्या वाहनाने उपस्थित राहून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही फक्त लढ म्हणा असे म्हणत उपस्थित राहून एक सामाजिक बळ एक सामाजिक ताकद संघटनेच्या पाठीशी असल्याचे दाखवून दिले त्यामुळे आता या महाराष्ट्र आधार सेनेच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे राजकीय वर्तुळात या महाराष्ट्र आधार सेनेचा बोलबाला होत असताना दिसत आहे. वडवणी तालुक्यातील चिंचाळा

पान २ वर

# एसपी साहेब, बीड जिल्ह्यात नेमकं चाललय तरी काय?

## गोरक्षक यांच्यामुळे बीड जिल्ह्याच्या इतिहासात गायीच्या हाडांची तस्करी करताना धडाकेबाज कारवाई

गेवराई । प्रतिनिधी

भेंडटाकळी फाटा येथे रोडवर भेंडटाकळी येथील युवकांनी बोलेरो पीकअप गाडी पकडून ठेवलेली आहे. त्या वाहनात गोवंश जातीचे जनावरांची हाडे, शिंगे इत्यादी आहे. तुम्ही तिकडे जावुन कारवाई करा असा तोंडी आदेश दिल्यावरुन मी, सोबत पोउपनि/स्वप्नील कोळी, पोशि/१३७१ औसरमल, पोअं/९७४ राठोड, चापोअं/२२३३ जाधव असे सरकारी वाहनाने तलवाडा येथुन निघुन गढी ते माजलगाव रोडवर भेंडटाकळी फाटा येथे २०.००० वा. पोहचलो असता तेथे रोडवर गर्दी जमलेली होती. आम्ही खाली उतरुन तेथे आम्हाला एक बोलेरो पीकअप गाडी उभी दिसली. आम्ही सदर गाडीची बॉडी पाहिली असता सदर गाडीतून उग्र वास येत होता. आम्ही तसेच तेथे हजर असलेले सचिन राठोड, विकास राठोड, पवन राठोड अशांनी गाडीमध्ये चढुन पाहणी केली असता गाडीमध्ये गोवंश जातीचे जनावरांचे हाडे, शिंगे मुंडके त्यास मांसचा अंश चिटकलेले दिसत आहे.



गोवंश जनावरांची कत्तल करुन हाडे, शिंगे व त्यांचे राहिलेले अवशेष विक्री साठी घेवुन जात असल्याचे दिसत आहे. गाडीमध्ये असलेले चालक व इतर दोन इसम यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव गाव चालक १) रशिद हारुन कुरेशी, हेलकरी २) रेहान रशीद कुरेशी दोन्ही रा-इंदिरानगर ता. मंठा जि. जालना ह.मु. वांगी रोड परभणी ३) आरीफ दाऊद शेख रा-खानापुर रोड, परभणी असे असल्याचे सांगितले. त्यांना पोउपनि कोळी यांनी विचारले की, गाडी मध्ये असलेल्या गोवंश जातीचे जनावरे यांची कत्तल केल्यानंतर राहिलेले हाडे, शिंगे इतर अवशेष कोठुन आणले असता त्यांनी सांगितले कि, तलवाडा ता. गेवराई येथुन १) जावेद बुडन कुरेशी २) साहिल शफी कुरेशी ३) जावेद बाबु कुरेशी सर्व रा- तलवाडा ता. गेवराई जि. बीड यांचेकडुन आणलेत व उर्वरित गेवराई येथुन कुरेशी मोहल्ला येथील इसमांकडुन आणल्याचे सांगत आहे. सदर रोडवर वाहनांची व लोकांची गर्दी असल्याने सदर वाहन सदर ठिकाणावरुन तात्काळ हालवुन तलवाडा येथील वजनकाटा येथे जावून सदर वाहनात भरलेल्या गोवंश जातीचे जनावरे यांचे कत्तल केल्यानंतर राहिलेले हाडे, शिंगे यांचे वजन केले असता ते १० क्विंटल ६० किलो भरले असुन खाली गाडीचे वजन २२ क्विंटल ७५ किलो भरलेले आहे. तरी सदर वाहन पोलीस ठाणेस आणून जप्त केलेले आहे. सदर कारवाईत मिळुन आलेल्या मुद्देमालाचे वर्णन व किंमत खालीलप्रमाणे१.५३,०००/- रु किंमतीचे गोवंश जातीचे जनावरांची हाडे, शिंगे १० क्विंटल ६० किलो प्रति किलो ५०रुपये प्रमाणे२. ३,००,०००/- रु किंमतीची पांढ-या रंगाची बोलेरो पीकअप गाडी वाहन क्रमांक-चक२४-ण१५८१ जु.वा.कि.अं.-एकूण-३,५३,०००/-रु येणेप्रमाणे वरील वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल पोलीस ठाणेस आणुन जप्त केलेला आहे. त्याचा पंचनामा पोउपनि/एस.डी. कोळी यांनी केलेला आहे.तरीदिनांक-१४/०६/२०२५ रोजी १९.४५ वा. सुमारास सदर वाहनाचा चालक नामे ।) रशिद हारुन कुरेशी, हेलकरी २) रेहान रशीद कुरेशी दोन्ही रा इंदिरानगर ता. मंठा जि. जालना ह.मु. वांगी रोड परभणी ३) आरीफ दाऊद शेख रा-खानापुर रोड, परभणी यांनी तलवाडा येथुन ४) जावेद बुडन कुरेशी ५) साहिल शफी कुरेशी ६) जावेद बाबु कुरेशी सर्व रा- तलवाडा ता. गेवराई जि. बीड यांनी व ७) गेवराई येथुन कुरेशी मोहल्ला येथील इसमांनी बेकायदेशीररित्या विनापरवाना गोवंश जातीचे जनावरांची कत्तल करून त्यांचे अवशेष हाडे, शिंगे स्व:ताचे आर्थिक फायद्यासाठी ८) वसीम लायक कुरेशी रा-परतुर जि. जालना यास विक्री करुन वाहतुक करतांना मिळुन आले. म्हणून माझी सर्व नमुद सर्वाविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सन १९७६ (सुधारित १९९५) कलम ५.५ (क), ९.९ (अ) प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे. याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.



## बीड पोलीस ठाणे हद्दीत चोरीला गेलेले मोबाईल दिले नवनीत कॉवताच्या टीमने शोधून दिले पेठ बीड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

बीड । प्रतिनिधी

पोलीस ठाणे पेठ बीड पोलीसांनी २७८,०००/- रु. किंमतीचे एकुण १३ गहाळ मोबाईलचा शोध घेवून तक्रारदारांना केले परत.पोलीस ठाणे पेठ बीड येथे नागरिकांचे मोबाईल गहाळ झाले बाबतच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर तक्रारीच्या अनुषंगाने गहाळ मोबाईलचा तांत्रीक विश्लेषणाद्वारे शोध घेणे कामी पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक मुदिराज यांनी पोलीस ठाणे पेठ बीड येथे नेमणुकीस असलेले सायबर डेस्कचे पोलीस उप निरीक्षक मन्सुर इब्राहीम शहा यांना आदेश दिले होते.

त्याप्रमाणे पोलीस ठाणे पेठ बीड येथील अभिलेखावरील गहाळ मोबाईल शोध मोहीम राबविण्यात आली. त्यामध्ये पोउपनी मन्सुर शहा यांच्या पथकाने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांचेकडुन माहिती मागवून तसेच अथक परिश्रम घेवुन तांत्रीक विश्लेषणाद्वारे शोध घेवुन वेगवेळ्या कंपनीचे एकुण १३ मोबाईल किंमत अंदाजे २७८,०००/- रु. किंमतीचे मोबाईल रिकव्हर करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातुन मोबाईल परत मिळविण्यात यश आले.

आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉंक्त सो. यांच्या हस्ते गहाळ/मिसींग मधील एकुण १३ तक्रारदार यांना मोबाईल परत करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमासाठी मा. श्री. सचिन पांडकर अप्पर पोलीस अधिक्षक बीड, मा. श्रीमती पुजा पवार परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक, अशोक मुदीराज पोलीस निरीक्षक पेठ बीड हे उपस्थीत होते.

# शाहीन अकादमीच्या अल्मा फातिमा ने बीड जिल्ह्याचे नाव देशभरात गाजवले

## शाहीन अकॅडमी बीडमध्ये पालकांसोबत भव्य सत्कार

बीड । प्रतिनिधी

शहरातील अल्मा फातिमा असद अली या विद्यार्थिनीने नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादन करत श्रेणी रँक ९४० आणि ९९.८७ पर्सन्टाईल मिळविले आहे. या दणदणीत निकालामुळे तिची सुप्रसिद्ध एम्स रुग्णालयामध्ये एमबीबीएसची जागा निश्चित झाली आहे. तिच्या या यशामुळे शाहीन अकॅडमी बीड मध्ये तिचा पालकांसोबत जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. अब्दुल कादिर, अब्दुल हसीब सर आणि अब्दुल मुकीद सर ही त्रिमूर्ती फक्त सधन घरातील विद्यार्थीच चांगले घडवीत आहेत असे नाही तर समाजाच्या तळागाळातील विद्यार्थ्यांना सुद्धा मदतीचा हात देत, त्यांच्यातील गुणवत्ता हेरून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून यशस्वी करत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शाहीन अकॅडमी मध्ये अशारीतीने उत्कृष्ट शिक्षण देण्याचे कार्य केले जात आहे. या अकॅडमीच्या देशभरात अनेक शाखा आहेत. या सर्वच शाखांमध्ये शाहीन अकॅडमीचे विद्यार्थी उल्लेखनीय यश मिळवीत आहेत. बीड शहरासह संपूर्ण भारतात आणि परदेशात सुद्धा शैक्षणिक संकुले सुरू करण्यात आली आहेत. विभागीय कार्यालय बिदर कर्नाटक येथे शाहीन अकॅडमीच्या पहिल्या शाखेची सुरुवात करण्यात आली होती. तिथे लावलेल्या या शैक्षणिक रोपट्याचे आज संपूर्ण भारत भरात अनेक ठिकाणी शाखा आहेत. प्रत्येक शाखेमध्ये पहिली शाखा असलेल्या बिदर सारखेच शिक्षणतज्ञ शिक्षक कार्यरत आहेत. बीड शहराची शाखा सुद्धा याला अपवाद नाही. येथेही तज्ञ व पारंगत शिक्षक विद्यार्थ्यांच्या दिमतीला आहेत. यामुळेच अल्मा फातिमा सारखी विद्यार्थिनी स्वत:च्या अभ्यासासोबतच तज्ञ शिक्षकांनी शिकविलेल्या शिक्षणामुळे नीट च्या परीक्षेत मोठी झेप घेऊ शकली. आणि संपूर्ण भारतातून नीट परीक्षा दिलेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये दणदणीत यश मिळवू शकली. तिने मिळविलेल्या यशामुळे प्रसिद्ध एम्स मध्ये तिची एमबीबीएस साठी जागा निश्चित झाली आहे.

या दणदणीत निकालामुळे शाहीन अकॅडमी बीड कडून अल्मा आणि तिच्या पालकांचा विशेष सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात नवीद उज्जमा, फखरुज्जमा, डॉक्टर फिरोज शेख, माजी उपनगराध्यक्ष फारुख पटेल, जमीयत उलमा ए हिंदचे बीड जिल्हाध्यक्ष मुफ्ती अब्दुल्ला, मौलाना साबीर, अश्फाक इनामदार, ज्येष्ठ पत्रकार सी.आर.पटेल, पत्रकार जावेद पाशा, नबिल उज्जमा, गुलाम साकिब, मुज्तबा खान सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट बीडचे शाखाप्रमुख प्रा.डॉ. इम्रान मुनीर खान यांनी आभार व्यक्त केले.



## सोन्याचे रोन चोरणाऱ्या महीलांची टोळी जेरबंद, स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

दिनांक १७ श्री कुंदन बालासाहेब जोगदंड, वय २३ वर्ष, रा काम की संग, केज यांनी पोलीस अथे फियकी, त्याचे स्वत:चे श्री ज्वेलर्स नामक दुकाणामध्ये अज्ञात चार महीलांनी गिऱ्हाईक पनि पायारान्तर चादरीची चैन विकत घ्यायची आहे दाखवा असे म्हणुन बऱ्याच चांदीच्या चैन पाहील्या चाची नजर चुकवुन चांदीच्या चैन चोरुन नेल्यावरुन त्याचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी सदरील गुन्हा उघडकीस यासाठी ली.तसाच आजीबर मारुन १) सुमन चोक्ट येडवे, तो मोत५६ वर्ष, ३. बस कंगार, वय ६१ वर्ष, ४. व्दारकाबाईत बौराडे, वय ४० वर्ष, सर्व रा. मुर्शदपुर ता.जि.बीड यांना ताब्यात घेतले व त्याचे कडे अरपा पर्समध्ये चोरीर दिसुन आल्या. त्यांनी सदरील चैन केज येथील सोन्याचे दुकाल केरीस गेलेले चांदीचे चैन जप्त करुन महीला आरोपी व चांदीचे पोलीसवात दिले आहेत.

समय से नबनित कॉल अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री शिब घटवाड, पोलीस निरी स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णु सानप, सचिन आंधळे, महीला पोलीस स्वाती मुंडे, चालक नितीन वडमारे यांनी केली आहे.

## स्पार्कल इंग्लिश स्कूलच्या वतिने शैक्षणिक विकासाला चालना मिळणार : दिलीप बाबा घोगे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील सावता नगर येथे नवीन इंग्लिश स्कूलचे उद्घाटन झाले आहे. या शाळेच्या उद्घाटनाने शहरात शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवीन पर्व सुरू झाले आहे. या शाळेच्या स्थापने मुळे शहरातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची उत्तम संधी मिळणार आहे. तसेच पालकांना आपल्या पाल्यांना शहरातच दर्जेदार शिक्षण देण्याची सोय होणार आहे. या शाळेमुळे शहराच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. या शाळेचे उद्घाटन चिंतेश्वर मंदिर मठाधिपती दिलीप बाबा घोगे यांच्या हस्ते रविवारी दि.१५ जुन रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले.



बी एन शेलकर एज्युकेशन सोसायटी संचालित स्पार्कल इंग्लिश स्कूल शाळेचे उद्घाटन करण्यात आले असून याचा सर्वसामान्य गुळगुळीत लोकांसाठी कमी फीस मध्ये उत्तम शिक्षण देण्यात येणारे संस्था आहे विठ्ठलरावांनी निर्मिती केलेल्या स्पार्कल विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा सोनं करणार यामुळे त्याचा सर्वांना फायदा होणार आहे. नव्याने सुरू केलेल्या बी.एन. शेलकर एज्युकेशन सोसायटी संचलित स्पार्कल इंग्लिश स्कूल चे उद्घाटन चिंतेश्वर मंदिर मठाधिपती दिलीप बाबा घोगे यांच्या हस्ते करण्यात आले. ही शाळा विद्यार्थ्यांना पूर्ण शिक्षण व उत्तम संस्कार देऊन पालकांचा विश्व जिंकलाशी अपेक्षा करत संस्थेचे संचालक व सर्व कर्मचारी वर्गाला बाबांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बाबांनी उपस्थित सर्व पालकांना देखील मार्गदर्शन केले. या शाळांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी घडवणे ही एक प्रकारे समाजसेवा तसेच देशकार्य आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; जो घेणार तोच विविध क्षेत्रात गरजणार असल्याचे प्रतिपादन शाळेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल शेलकर यांनी केले.

लहान मुलांना योग्य वेळी योग्य शिक्षण मिळाले तर देशाचे भवितव्य घडवू शकतात. शिक्षणाचा खरा संघर्ष होतो. त्यामुळे शिक्षणात कितीही काटे आले तरी कुठेही थांबायचे नाही. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो घेणार तोच विविध क्षेत्रात विविध ठिकाणी गरजणारच असल्याचे सांगून आज या ठिकाणी चालू केलेल्या या इंग्लिश स्कूल शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भवितव्य निश्चितच होणार असल्याचा विश्वास विठ्ठलराव शेलकर यांनी व्यक्त केला.

# आचार्य टाकळी येथे तलाठी कराड यांचा सत्कार



सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील आचार्य टाकळी येथील तलाठी कार्यालय या ठिकाणी तलाठी पदी आज रोजी कार्यरत असलेले श्री कराड साहेब. तलाठी अधिकाऱ्यांचा सन्मान व मनमिळाऊ अधिकाराचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित सिरसाळा पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल भक्ताने साहेब, पत्रकार बाळासाहेब गरड, मा. शाळा समिती अध्यक्ष परमेश्वर आचार्य, दैनिक आरंभ चे परळी तालुका पत्रकार बापू किरवले या आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाटोदा येथे प्रियदर्शनी प्राथमिक शाळेची नवीन इमारत उभारणार

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन

बीड । प्रतिनिधी

येथील विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोद्यातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.१७) पार पडले.

पाटोदा शहरातील श्रीराम कॉम्प्लेक्समध्ये खाजगी जागेत आतापर्यंत ही शाळा सुरू होती. परंतु विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, या हेतूने आता संस्थेने स्वमालकीच्या जागेत इमारत बांधण्याचा निर्णय घेतला आहे. भूमिपूजनप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक डॉ.विश्वंभर देशमाने, प्रियदर्शनी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पवनकुमार मोरे, कन्या शाळेचे मुख्याध्यापक



सचिन खोले, श्रीकांत लांडगे, बबन राख, पोपट उगले, संकेत माताडे, जयश्री शेलार, नवनाथ ठाकणे, अनिल राख, प्रताप नवले, मुळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. दरम्यान, विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा देण्याच्या दृष्टीने इमारत बांधकामाचा निर्णय घेण्यात आला.

### पाटोद्यातील तिन्ही शैक्षणिक संस्थांना भेटी

विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोद्यातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, प्रियदर्शनी कन्या प्रशाळा, नवगण शिक्षण संस्था संचलित वसंतदादा पाटील महाविद्यालय या तिन्ही शिक्षण संस्थांना डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी भेटी दिल्या. यावेळी त्यांनी नवीन शाळा प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे स्वागत करून शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पान १ वरून...

## गेवराईच्या पुढाऱ्यांना लोकांची मतदानापुरती गरज आहे का?

सुरेश जाधव यांनी खळेगाव मधील शेती विकून बँकेत पैसे ठेवले होते. आता मुलीच्या लग्नांसाठी पैश्याची गरज होती.त्यासाठी बँकेत चेकरा मारत होते. रात्री उशीरा बँकेच्या गेटला फाशी घेऊन जीवन संपविले.

सविस्तर वृत्त असे की गेवराई शहरातील बँकेच्या गेटवर गळफास घेऊन बापाने आयुष्याचा दोर कापला. गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील सुरेश आत्माराम जाधव नामक चाळीस वर्षे व्यक्तीने केली आत्महत्या. ११ लाख रुपयांची ठेव बँकेत ठेवल्याची माहिती मिळाली आहे. वारंवार पैसे मागूनही बँकेकडून पैसे दिले जात नसल्याने जाधव यांनी आत्महत्येचं पाऊल उचलल्याची माहिती मिळाली. पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून पुढील कारवाई करण्यात येत आहे. जाधव यांच्या आत्महत्येची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. पोलिसांनी मृतदेह पोस्टमार्टम करण्यासाठी पाठवला असून पुढील तपास करण्यात येत आहे. रक्कम किती होती आणि याबाबतची इतर संपूर्ण माहिती घेऊन रीतसर गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी माहिती गेवराई पोलिसांनी दिली आहे. या प्रकारानंतर गेवराईमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. बीडच्या गेवराई तालुक्यातील खळेगाव मधील ठेवीदार सुरेश आत्माराम जाधव यांनी छत्रपती मल्टीस्टेट बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केली. जाधव यांच्या छत्रपती मल्टीस्टेट बँकेत ११ लाख आणि ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये ५ लाख रुपये अडकले होते. मुलीच्या लग्नासाठी पैशांची गरज होती. मात्र सतत बँकेच्या फेऱ्या मारूनही त्यांना रक्कम परत मिळाली नाही. या मानसिक त्रासामुळे त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं. रात्री उशिरा कुटुंबासह बँकेत गेलेले जाधव, काही वेळातच बँकेच्या गेटवर मृत अवस्थेत आढळले. या प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मल्टीस्टेट बँकांची विश्वासार्हता पुन्हा एकदा समोर आली आहे.

## ग्रामपंचायतमध्ये बोगस कामे करण्यासाठी निवडी हे कटकारस्थान असल्याचे प्रकार

सही करून त्याला मान्यता देत आहेत. तरी आपणास संघटनेकडून विनंती करण्यात येते कि, आशा झालेल्या नेमणुका आपण तात्काळ रद्द करण्याचे कारण दिनांक १८/०९/२०२३ च्या शासन निर्णयाच्या शुद्धिपत्रकाचे अवलोकन करावे व तसे ग्रामपंचायतला अतिरिक्त ग्रामरोजगार सेवक म्हणून झालेले निवडी रद्द करण्याचे पत्र द्यावे नसता ग्रामरोजगार सेवक तालुका संघटनेकडून आपल्या कार्यालासमोर दिनांक २४-६-२०२५ मंगळवार सकाळी १० वाजल्या पासून आमरण उपोषणला बसणार आहोत. जोपर्यंत अतिरिक्त रोजगार सेवक ऑनलाईन वरून कमी होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालयाची राहील असा इशारा त्यांनी दिला आहे.

## बीड जिल्ह्यातील दिनदलित शोषितांना न्याय मिळवून देण्यासाठी

डुकडेगाव या गावी शाखाची उद्घाटन करण्यात आले.

गावांमध्ये ढोल ताशाच्या मिरवणुकीमध्ये महापुरुषांची चौकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक दीपक थोरात यांनी सांगितले की ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा म्हणून महाराष्ट्र आदर सेनेचा ब्रीदवाक्य घेऊन आज जनसेवेसाठी ही सामाजिक संघटना काढलेली आहे येणाऱ्या काळामध्ये नक्कीच सत्तेतल्या नेत्यांना अठरापगड जातीला न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी दलित मागासवर्गीय समाजाचे प्रश्न शासन दरबारी मांडणार आहोत येणाऱ्या काळामध्ये महाराष्ट्र मध्ये होणारे अन्याय अत्याचार व जातीयवादाचे विरोधामध्ये महाराष्ट्र आधार सेना ही उभा राहणार आहे. यावेळी वडवणी तालुक्यातील चिंचाळा व डुकरे गाव येथील शेकडो कार्यकर्ते यांनी महाराष्ट्रात सेनेमध्ये प्रवेश केला. यावेळी मांग महार बंजारा वंजारी मराठा मुस्लिम धनगर गोपाळ सह अठरापगड जातीतील कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र आधार सेनेच्या पाठीशी उभा राहण्याला पसंती दर्शविली आहे.

महाराष्ट्र आधार सेना संस्थापक अध्यक्ष दिपक थोरात, कार्याध्यक्ष उद्धव आरे, सतीष (आप्पा) हानवते (तालुका प्रमुख), प्रशांत गव्हाणे (शहर उपाध्यक्ष), वापू आवाड (शाखाध्यक्ष), अनिल आवाड (युवा जिल्हा उपाध्यक्ष), सचिन पाटोळे (तालुका कार्याध्यक्ष), शक्ती आवाड (उप शाखाध्यक्ष), अशोक (आबा) वाघमारे (युवा नेता, बीड), सखाराम आवाड (शाखा सचिव), उमेश आवाड (उसतोड कामगार अध्यक्ष), अर्जुन सरवदे (युवा शहराध्यक्ष), अर्जुन पाटोळे (उसतोड कामगार तालुकाध्यक्ष), अभिषेक आडागळे (बडवणी तालुका विध्यार्थी आघाडी), चिंचाळा शाखा साहेबराव आडे (शाखाध्यक्ष), अण्णासाहेब आवाड (उप शाखाध्यक्ष), नितीन मोरे (शाखा सचिव), शाखा नं.०२ डूकडेगाव, शाखाध्यक्ष बापू आवाड उप शाखाध्यक्ष), शक्ती आवाड (शाखा सचिव), सखाराम आवाड, अशोक हतागळे करण सरवदे अमोल मजमले. मिलिंद पाटोळे, गणेश.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीअशोक हतागळे, करण सरवदे, अमोल मुजमुले, मिलिंद पाटोळे, गणेश करपे, सखाराम आवाड, किरण तिडके, सतीष बडे, आबासाहेब बडे, रमेश आवाड, सुशांत मुरकुटे, शक्ती आबाड, संजय आवाड, नारायण आवाड, प्रल्हाद आवाड, बापु आवाड, कुमार आवाड, हर्षवर्धन आवाड, सचिन लोखंडे, दीपक आवाड, शिवा आवाड, महादेव आवाड, लहू आवाड, विकास लोंढे, नादु शेख यावेळी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# लिंबागणेशकरांनी १८ जुन शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळला

## परिशिष्ट ९ शेतकरी विरोधी कायदे रद्द करा : डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला.२६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना स्वीकारली गेली.या राज्यघटनेत सर्वांना मुलभूत अधिकार देण्यात आले होते.मात्र अवघ्या दिड वर्षात १८ जुन १९५१ ला निर्वाचित नव्हे तर काळजीवाहू हंडामी सरकारने पहिली घटना दुरुस्ती खरंतर घटना बिघाड करत घटनेत नसलेले परीशिष्ट ९ जोडण्यात आले.अनुच्छेद ३१ (अ)व (ब) नुसार परीशिष्ट ९ मधील समाविष्ट कायद्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद आहे. आज परिशिष्ट ९ मध्ये २८४ कायदे असुन त्यापैकी २५० हुन आधिक कायदे थेट शेतकऱ्यांशी निगडित आहेत. ही घटना दुरुस्ती शेतकऱ्यांना कर्दनकाळ ठरली असुन तिचा परीणाम म्हणून लाखों शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे.

हा घटना बिघाड १८ जुन १९५१ रोजी करण्यात आला यांच्या निषेधार्थ किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनात डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २०१७ पासुन ग्रामस्थांच्या वतीने १८ जुन शेतकरी पारतंत्र्य दिवसपाळण्यात येतो. आज दि.१८ बुधवार रोजी किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली किसान पुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत कार्यालयात दंडाला काळ्या फिती लावून व शेतकरी विरोधी कायद्यांची माहिती ग्रामस्थांना देत शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळण्यात आला. शेतकऱ्यांसाठी गळफास ठरणारे त्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरलेले १)कमाल शेतजमीन धारणा (सीलिंग) २) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा ३ प्रमुख शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, कृषीमंत्री, विभागीय आयुक्त यांना ईमेल द्वारे करण्यात आली.

यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, पंचायत समिती माजी सदस्य राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, दामु आण्णा थोरात, अशोक जाधव अर्जुन घोलप, अँड. गणेश वाणी, पांडुरंग वाणी, विक्रांत वाणी, संतोष भोसले, संतोष वाणी, नामदेव वाणी, शिवाजी शिंदे, विक्रांत दाभाडे, दादा गायकवाड, राजेंद्र वायभट, लेनाजी गायकवाड, राजेंद्र आगवान, दादाराव येडे, तुषार गायकवाड , प्रमोद निर्मळ, बापु थोरात, दिपक थोरात, कचरू निर्मळ आदी शेतकरी आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर आदि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

**शेतकरी पारतंत्र्यात कसा?**

देशातील अन्य सर्व नागरिकांना आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात कोर्टात दाद मागता येते परंतु शेतकऱ्यांना नाही. प्रत्येक उत्पादक आपल्या मालाची किंमत स्वत: ठरवू शकतो परंतु शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत ठरवता येत नाही. कोणाच्या मालमत्तेला कोणीही धक्का लावु शकत नाही. सरकार सुद्धा नाही.पण सरकार शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन ईतर कोणालाही देऊ शकते. आपल्या उत्पादन साधनाचा आकार किती लहान किंवा मोठा असावा, हे ठरविण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिला आहे परंतु तो आधिकार शेतकऱ्यांना नाही. मग शेतकरी स्वतंत्र कसा?? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे आजही शेतकरी पारतंत्र्यात आहे.

# 'मल्टिस्टेट' गल्लीत, नियंत्रण दिल्लीत! किशोर कानडे

## जिल्ह्यात आणखी ५ मल्टिस्टेट मध्ये उपहार दबक्या आवाजात चर्चा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अडचणीतल्या काही नागरी सहकारी आणि ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांनी ठेवीदारांची फसवणूक केल्याचे लेखापरीक्षणाने सिद्ध झाले आहे. या संस्थांची नोंदणी सहकार खात्याकडे असल्याने जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दोषींवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू केली. ही वर्तमान स्थिती असताना, दुसरीकडे 'मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' नावाने ठेवीदारांना अधिक व्याजदर देणार्या संस्था शहर व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उगवल्या. या संस्थांची नोंदणी थेट दिल्लीत आहे. त्यावर राज्य सहकार खात्याचे नियंत्रण नाही. अशा संस्थांच्या विरोधात दाद मागायची असेल तर थेट दिल्ली गाठावे लागेल.

पाहणी, तपासणी नाही

संस्था कुठे होणार, कार्यवाहक कोण आहेत, कसे आहेत, त्यांच्याकडील जबाबदारीची हमी काय, कसा कारभार होत असतो, याबाबत केंद्रीय निबंधकांकडून कुठलीच पाहणी आतापर्यंत नाही. नियमित तपासण्या नाहीत. महिन्यापूर्वी राज्य शासनाच्या अखत्यारीतील जिल्हा उपनिबंधकांना या संस्थांची पाहणीचे निर्देश दिले होते; परंतु तपासणीचे कुठलेच अधिकार नाहीत. त्यामुळे जिल्हा उपनिबंधकांनीही त्याकडे गांभीर्याने पाहिलेले नाही.

**ठेवींना नाही विम्याचे संरक्षण**

या संस्थेत जमा होणाऱ्या ठेवरकमांना विम्याचे संरक्षण नाही. संस्था अडचणीत आल्यानंतर पैसे मिळवायचे असतील तर स्थानिक स्तरावर कुठलेच कार्यालय नाही. ग्राहक मंचात दाद मागितली तरी दिल्लीतल्या निबंधकांनाच प्रतिवाद करावे लागेल.

**पतसंस्था बरी म्हणायची वेळ**

दिल्लीच्या मल्टिस्टेट संस्था नोंदणी कार्यालयातील कामकाज पाहिले. आपल्याकडील तलाठी कार्यालये बरी वाटली. कोणीही कुठेही शिक्का मारतो. त्यामुळे संस्था मोठ्या संख्येने वाढल्या. ठेव रकमा जमा करू लागल्या. त्यावर कुठले संरक्षण नाही. राज्य शासनाच्या सहकार खात्याकडे त्याच्या विरोधात दाद मागता येत नाही. ही स्थिती पाहता, पतसंस्था बर्या म्हणण्याची वेळ आली आहे.''

**लेखापरीक्षण करा**

मल्टिस्टेट संस्थेतील ठेवीदारांची सध्या तरी तक्रार नाही. त्याचे कारण या संस्थांचे सरकारी लेखापरीक्षण नाही, कुठल्या अधिकार्यांकडून तपासणी नाही. या बाबी आल्या तर संस्थांची खरी स्थिती आढळून येईल.

**किशोर कानडे**, भ्रष्टाचारविरोधी जनांदोलन, अध्यक्ष प्रभु श्रीरामचंद्र प्रतिष्ठान

**का वाढल्या संस्था**

शहर आणि जिल्ह्यातील बहुतांश नागरी सहकारी पतसंस्था डबघाईस आल्या. त्यामुळे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने नव्या संस्थांची नोंदणीच बंद केली. फक्त महिला आणि नोकरदारांच्या पतसंस्थांची नोंदणी सुरू आहे. दिल्लीतल्या केंद्रीय निबंधकांकडे सहज नोंदणी मिळते म्हणून मल्टिस्टेट संस्था वाढल्या.

# विकास कामे हीच आमच्या कामाची पावती

## आ.धस यांच्या माध्यमातून गावाला सुजलाम सुफलाम करणार!

दौलावाडगाव । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून विकास कामाला बसलेली खिळ व कागदोपत्री होणारा विकास लोकांनी प्रत्यक्ष पाहिला आहे. पण विकास काय असतो. हे आम्ही आरश्या प्रमाणे दाखवत आहोत. विकास कामे हीच आमच्या कामाची पावती असून आ.सुरेश आण्णा धस याच्या माध्यमातून गावाला सुजलाम सुफलाम करणार असल्याचे अरणविहारा तागडखेल ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंचपती आण्णासाहेब शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.

आष्टी तालुक्यातील अरणविहारा, तागडखेल ही ग्रुप ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावासह लमाणतांड्यावर गेल्या अनेक वर्षांपासून विकास कामे बोटावर मोजता येतील एवढेच झाले. बाकीचे कामे कागदोपत्री दाखवून लाखो रूपयांचा निधी आपल्या खिशात घालत गावासाठी आलेला निधी हडप केला. आणि गावाला विकासापासून कोसोदूर ठेवण्याचे पाप काही महाभाग लोकांनी केले. पण जेव्हापासून गावाने आमच्यावर विश्वास टाकून निवडून देत सरपंच केले. तेव्हापासून आजपर्यंत ग्रामपंचायत अंतर्गत अनेक विकासकामे केली. एवढेच नव्हे तर पदरमोड करून देखील पैसा गुंतवणूक केला. आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस, युवानेते जयदत्त भैय्या धस, सागर आप्पा धस यांचे वेळोवेळो मार्गदर्शन मिळत असून यापुढे देखील त्याच्या माध्यमातून गावात विकासकामे करून गावाला सुजलाम सुफलाम करणार असल्याचे आण्णासाहेब शिरसाठ यांनी सांगितले.

# स्टेट बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील कडा येथील भारतीय स्टेट बँकेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर कडा शाखेत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५० जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

एक जुलै रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाचा ७० वा वर्धापन दिन आहे. यानिमित्त बँकेच्या कडा शाखेत मंगळवारी दि. १७ जून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगर येथील अर्पण ब्लड बँकेच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात बँकेचे कर्मचारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्यांसह पन्नास बँक खातेदारांनी आपला सहभाग नोंदवला. सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी बँकेचे शाखा व्यवस्थापक नवनाथ शेळकेसह त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. बँकेच्या या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

# सुरेश वाघमारे यांची आसपा च्या उत्तर मुंबई जिल्हाध्यक्षपदी चौथ्यांदा निवड

मुंबई । प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीतील युवा आंदोलक तथा पत्रकार सुरेश वाघमारे यांची खासदार ऍड,चंद्रसेखर आजाद यांच्या आजाद समाज पार्टी च्या उत्तर मुंबई जिल्हाअध्यक्ष पदी नुकतीच घाटकोपर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहिद स्मारक हॉल मध्ये आजाद समाज पार्टी कांशीराम या पार्टीची मुंबई प्रदेश कार्यकारणी निवड व कार्यकर्ता समीक्षा बैठक घेण्यात आली.

यावेळी प्रामुख्याने राष्ट्रीय प्रभारी महाराष्ट्र प्रदेश गौरिप्रसाद उपासक, महाराष्ट्र अध्यक्ष मनीष साठे, मुंबई प्रदेश प्रभारी, सत्यजित साळवे, हे प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी गौरिप्रसाद उपासक यांनी महिला मोर्चा च्या महाराष्ट्र प्रभारी पदी नेहाताई शिंदे, यांना पदोन्नती दिली तर योगिनी पगारे यांना खासदार ऍड भाई चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार आसपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी निवड घोषित केली, तसेच मुंबई प्रदेश अध्यक्ष पदी कैलास जैस्वार यांना पुन्हा संधी दिली याच बैठकीत सुरेश वाघमारे यांना सलग चौथ्यांदा उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष पदाची धुरा सोपविली. पक्षाला एकनिष्ठ आणि प्रामाणिक पणा दाखवील्यामुळे तसेच संघटन कौशल्य, आणि आंदोलक चेहरा म्हणून सुरेश वाघमारे यांची पुन्हा निवड केली असून वाघमारे हे भीम आर्मी चे सुद्धा जिल्हा अध्यक्ष होते नन्तर पार्टी मध्ये प्रवेश घेत राजकीय समीकरनात सक्रिय झाले, त्यांच्या या निवडीबद्दल, मालाड विधानसभा अध्यक्ष असगर अली मन्सूरी, मागाठाणे विधानसभा अध्यक्ष मुकेशकुमार गौतम, दहिसर विधानसभा विकास प्रजापती, श्याम केळकर, वॉर्ड क्रमांक ४९अध्यक्ष गजानन तांबे, आकाश ओव्हाळ, आदिसह जिल्ह्यातील विविध संस्था संघटना, राजकीय पक्षाकडून स्वागत होत आहे.





जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरवन पिंपरी येथे विद्यार्थी यांना शालेय पुस्तक आणि कपडे वाटप करण्यात आले. यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष शिक्षक शिक्षिका आणि विद्यार्थी.

# डायमंड कोचिंग क्लासेस, पाटोदा 'विज्ञानासाठी झपाटलेली पिढी' इस्त्रोच्या दिशेने वाटचाल

पाटोदा । प्रतिनिधी

शिक्षण म्हणजे केवळ गुणांपुरते मर्यादित नसून, ते ज्ञान, जिज्ञासा आणि शोधाची दिशा दाखवते. हे सिद्ध केले आहे. डायमंड कोचिंग क्लासेस, पाटोदा येथील विद्यार्थ्यांनी! डॉ. सी. व्ही. रामन बालवैज्ञानिक परीक्षा २०२५ मध्ये अपूर्व यश मिळवत, त्यांनी थेट इस्त्रो शैक्षणिक सहल व कार्यशाळेसाठी आपली पात्रता सिद्ध केली आहे.

या यशामध्ये केवळ गुण नव्हे, तर शिस्त, समर्पण आणि विज्ञानावर निखळ प्रेम दिसून येते. ही सहल ही केवळ पर्यटन नव्हे, तर एक प्रेरणादायी शास्त्रयात्रा आहे – जिथे आपल्या विद्यार्थ्यांना भारताच्या अवकाश संशोधन कार्यक्रमाचे प्रत्यक्ष दर्शन घडणार आहे.

गौरवशाली विद्यार्थी – ज्ञानदीप उजळवणारे तारे ८ वर्ग ५ वी – हर्षद हरिदास घुमरे – जिल्हा द्वितीय क्रमांक सृष्टी सुशीलकुमार सुरवसे – जिल्हा तृतीय क्रमांक रुद्र बाळासाहेब काळूशे – तालुका प्रथम क्रमांक अर्णव ओमप्रकाश आंधळे – तालुका द्वितीय क्रमांक आर्यन दादासाहेब जाधव – तालुका चतुर्थ क्रमांक ८ वर्ग ६ वी –आरव मनोज डोरले – तालुका द्वितीय क्रमांक हे यश म्हणजे केवळ स्पर्धा जिंकण्याचा आनंद नव्हे, तर स्वत:च्या क्षमतेवर ठेवलेला विश्वास आणि अभ्यासातील सातत्याचा विजय आहे.

डायमंड कोचिंग क्लासेस, पाटोदा तर्फे सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून अभिनंदन! हे विद्यार्थी भविष्यात भारताचे वैज्ञानिक, अभियंते, संशोधक आणि विचारवंत होतील, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला. विज्ञानाच्या दिशेने पावले टाकणारी ही पिढी उद्याची राष्ट्रनिर्माते ठरणार आहे.

– डायमंड कोचिंग क्लासेस, पाटोदा

# जुना बाजार कोतवाली वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरू करा

## अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू : मनसे शहराध्यक्ष अमरजान पठाण

बीड । प्रतिनिधी

शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक, कारंजा रोड, राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा तात्काळ काम सुरू करण्यात यावा अशी मागणी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगर परिषदेचे उपमुख्यअधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या एका निवेदनातून करण्यात आली आहे.



असे की, बीड शहराच्या मध्ये भागातून जाणाऱ्या शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक, कारंजा रोड राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पऱ्यांत रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठ – मोठाले खड्डे पडून सामान्य नागरिकांना रहदारीसाठी मोठा अडथळा येत आहे. शहरातील हा प्रमुख व्यापारी मार्ग असून दररोज या ठिकाणी जिल्हाभरातून नागरिक विविध व्यवसायाच्या निमित्ताने येतात तसेच सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर पाणी साचलेला असतो यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

यामुळे तात्काळ कोतवाली वेस ते जुना बजार, बलभीम चौक, करंजा रोड, राजुरी बेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम सुरू करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वर्षाताई जगदाळे (महिला आघाडी राज्य उपाध्यक्ष) याच्या नेतृत्वाखाली येत्या ३० जून सोमवार रोजी सकाळी ११:०० वाजता शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते राजुरी बेस, छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये बेशरम चे झाडे लावून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची प्रशासनाने दखल घ्यावी असे मनसेच्यावतीने बीड नगरपरिषद कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष) आशा कुटे (बीड जिल्हाध्यक्ष) कल्पना कवठेकर (जिल्हा उपाध्यक्ष) अमरजान पठाण (बीड शहराध्यक्ष) सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या अनुरागचा 'नीट' परीक्षेत देशपातळीवर डंका

## अनुसूचित जाती प्रवर्गातून देशात २३वा क्रमांक; एम्स प्रवेश मिळवणारा ठरणार जिल्ह्यातील पहिला विद्यार्थी

बीड । प्रतिनिधी

अभ्यासातील सातत्य, अपार मेहनत आणि स्वप्नांवर अढळ विश्वास यांच्या बळावर बीडच्या अनुराग बाबासाहेब मोरे याने वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या छएएढ (नीट) परीक्षेत अफलातून यश संपादन केले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातून देशात २३वा क्रमांक, तर सामान्य गुणवत्ता यादीत ९०२ वा क्रमांक मिळवून अनुरागने संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. केज तालुक्यातील वडमाऊली दहिफळ हे अनुरागचे मूळ गाव. सध्या तो बीड शहरातील धानोरा रोड, भगवान विद्यालय परिसरात वास्तव्यास आहे. त्याचे वडील बाबासाहेब मोरे हे पोस्ट कार्यालयात विमा अधिकारी म्हणून कार्यरत असून, आई शरयू मोरे या गृहिणी आहेत.



साध्या कुटुंबातून आलेल्या अनुरागने शाळेपासूनच अभ्यासात आपले प्राविण्य सिद्ध केले. सेंट अँन्स स्कूल, बीड येथून इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करत २०२३ साली दहावीत ९८.३३% गुण मिळवत शाळेत अव्वल क्रमांक पटकावला. त्यानंतर राजर्षी छत्रपती शाहू विज्ञान महाविद्यालय, लातूर येथे अकरावी व बारावीचे शिक्षण घेत २०२५ साली बारावीत ९२% गुण मिळवले. या यशाची खरी परीक्षा होती नीट–२०२५, ज्यामध्ये अनुरागने ७२० पैकी ६०८ गुण मिळवत भारतातील प्रतिष्ठित वैद्यकीय संस्थांपैकी एक असलेल्या –खखचड (एम्स) मध्ये प्रवेश मिळवण्यारा जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील पहिला विद्यार्थी ठरणार आहे. त्याला एम्स दिल्ली किंवा भोपाळ या ठिकाणी प्रवेश घेण्याची इच्छा आहे.

त्याच्या या यशामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. विविध शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय वर्तुळातून अनुरागचा गौरव होत आहे. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी अनुराग हे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. त्याच्या या प्रवासातून ग्रामीण विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवल्यास, कोणतीही मर्यादा आडवी येऊ शकत नाही, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.

मी हे यश माझ्या आई–वडिलांना, शिक्षकांना आणि माझ्या महाविद्यालयाला अर्पण करतो. एम्समध्ये जाणं हे माझं स्वप्न होतं, आणि ते पूर्ण झालं. ग्रामीण भागातून आलो असलो, तरी चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर काहीही शक्य आहे, हे या यशातून सिद्ध झालं.

**–अनुराग मोरे**

अनुरागचं यश आमच्यासाठी अभिमानाचं आहे. आम्ही कधीही त्याला तू हेच कर असं सुचवलं नाही, पण त्याचं स्वप्न जे होतं ते त्याने अपार मेहनत घेऊन पूर्ण केलं. आजचं यश हे फक्त त्याच्या चिकाटीचं फळ आहे. मी इतर विद्यार्थ्यांना एवढंच सांगतो – मोबाईल, व्यसनं आणि वाया घालवणाऱ्या गोष्टींपासून दूर रहा. आपल्या महापुरुषांनी आपल्यासाठी संधी निर्माण केल्या आहेत, त्याचं सोनं करा. अभ्यासात सातत्य ठेवा, यश हमखास मिळेल.

**– बाबासाहेब मोरे, वडील**

# जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाच्या स्वागताचा इव्हेंट बंद करून धोकादायक

## मोडकळीस आलेल्या सरकारी शाळांना भेटी देऊन मुलभूत सुविधा द्याव्यात : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने आयोजित काल दि.१६ सोमवार रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सवात जिल्हाधिका-यांचे १०० अधिकारी आणि लोकप्रतिनिधी शाळांमध्ये हजर राहिले यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कारेगव्हाण येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनावणे, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, आदींनी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

याच वेळी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अकरा तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असुन ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठा नाही तर थकीत वीज बिलामुळे ६२० शाळांमधील वीजपुरवठा खंडित केला असुन विद्यार्थ्यांचे संगणक, ई लर्निग, वीज उपकरणे बंद असल्याने डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली असुन जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने इव्हेंट करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांना भेटी देऊन शाळांची दुरूस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत.जिल्ह्यात ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन मोठा पाऊस अथवा वादळवारे आल्यास धोका निर्माण होऊ शकतो. जिल्हा परीषदेच्या शाळांच्या ईमारतीची दुरावस्था असुन कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत तर कुठे छत उघडे पडलेले तर कुठे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांची अडचण होत असुन दुर्घटना घडल्यास यास जबाबदार कोण?? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरूस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.

बीड जिल्ह्यातील तालुका निहाय मोडकळीस आलेल्या शाळा खालिल प्रमाणे आहेत


आष्टी तालुका ८० शाळांमधील ११९ वर्गखोल्या, अंबेजोगाई तालुक्यातील १६ शाळांमधील ३० वर्गखोल्या, बीड तालुक्यातील २८ शाळांमधील ३७ वर्गखोल्या, धारूर तालुक्यातील १७ शाळांमधील ३० वर्गखोल्या, केज तालुक्यातील १९ शाळांमधील २२ वर्गखोल्या, गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या, माजलगाव तालुक्यातील १३ शाळांमधील २६ वर्गखोल्या, परळी तालुक्यातील ४६ शाळांमधील ८८ वर्गखोल्या, पाटोदा तालुक्यातील ३१ शाळांमधील ४० वर्गखोल्या, शिरूर तालुक्यातील २४ शाळांमधील ३२ वर्गखोल्या, वडवणी तालुक्यातील १३ शाळांमधील ४३ वर्गखोल्या एकुण ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे.

**वायकर वस्ती येथे छत पडलेल्या वर्गात ज्ञानार्जन**

बीड तालुक्यातील मांडवजाळी ग्रामपंचायत अंतर्गत पिंपळवाडी केंद्र अंतर्गत वायकर वस्ती येथील शाळेच्या एका वर्गाचे छत पुर्णपणे कोसळले असुन सध्या ज्या वर्गात मुलं ज्ञानार्जन करत आहेत त्या वर्गातील छत पडण्याच्या अवस्थेत असुन मुलांच्या जिवीताला धोका असुन शेतकरी ऊसतोड मजुरांच्या लेकरांनी पावसाळ्यात शाळा उघड्यावर कशी शिकायची असा संतप्त सवाल पालक दादु पवार, सुशीला बहिरवाळ, अमोल बहिरवाळ यांनी केला आहे.

**शाळांमधील वीजबील थकीत असल्याने ४९७ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असुन तातडीने वीज पुरवठा करण्यात यावा**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठाच नाही तर जिल्ह्यातील ४९७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे १ कोटी ३ लाख ४५ हजार रुपयांचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केली आहे. त्यामुळे संगणक,ई लर्निग,एल ई डी टीव्ही, डिजिटल बोर्ड तसेच वीजेची उपकरणे बंद असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच बहुतेक शाळात अंधार आहे.अनेक शाळांच्या मागील भागात गवत आणि झाडेझुडपे असतात त्यातुन कधी विंचु तर कधी सापही शाळेत येतात. अंधार असल्याने अनेकदा दिसत नाहीत.वीज असेल तर अशा प्रकारचा धोका होणार नाही.शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.



# एक कोटीच्या आशेची वादळणी केली निराशा; मुलाला डॉक्टर करायचे स्वप्नही भंगले

आष्टी । प्रतिनिधी

अकरा वर्षांपूर्वी मोठी मेहनत करून लावलेली डाळिंबाची बाग कर्ज काढून उसनवारी करून घरातील सोने मोडून जोपासली दोन वर्षांपूर्वी तालुक्यात चांगला पाऊस होत असल्यामुळे यावर्षी आठ एकर मध्ये एक कोटी रुपये होतील यातून मुलाला एमबीबीएस डॉक्टर करू अशी इच्छा बाळगणारे आष्टी तालुक्यातील वटनवाडी येथील अर्जुन कासार यांचे स्वप्न बुधवारी सायंकाळी झालेल्या वादळी पावसाने व दोस्त केले तोडणीस आलेली त्यांचे डाळिंबाची वाघ जमीन दोस्त झाली मुलाला डॉक्टर करायचे व कर्ज फेडण्याचे स्वप्न अक्षरशः हवेत उडून गेले.



वटनवाडी येथील अर्जुन कासार यांनी २०१४ साली आठ एकरातील फळबागेत ३००० झाडे कष्टाने जो पुसली २५ लाख रुपये खर्च करून पाच किलोमीटर अंतरावर तलावातून पाईपलाईन आणली एक एकराच्या शेत तलाव ठिंबक सिंचन केले २०१८ मध्ये फळ आली त्यावेळी दुष्काळण्याचा फटका केला सलग तीन वर्ष दुष्काळात गेले कत चार-पाच वर्षापासून चांगले फळ येण्यास सुरुवात झाली होती यावर्षी पूर्ण डाळिंब बाग डोलाने भरली होती मोठ्या प्रमाणात फळे आल्याने यावर्षी ११० टन फळे निघतील व त्यातून एक कोटी रुपये होतील असा अंदाज होता येत्या पंधरा दिवसात डाळिंबाची विक्री होणार होती याच पैशातून सध्या नीट ची परीक्षा देणाऱ्या मुलाला एमबीबीएस करायचे स्वप्न होते परंतु आलेल्या वादळाने आर्थिक राहतील फळबाग उध्वस्त झाली झाडे उन्हाळून पडली या फळबागेसाठी कुटुंबाने काही वर्षापासून घेतलेली मेहनत अवघ्या अर्ध्या तासात वायाला गेली पडत होती हे पाहताना सर्व कुटुंबाला रडू कोसळत होते अशी आप भीती अर्जुन कासार यांनी सांगितले.

# जातीवादी गाव गुंडांकडून हॉटेल शिवमुद्राचे मालक अविनाश साबळे यांच्यावर प्राणघातक हल्ला

बीड । प्रतिनिधी

पालवन येथील रहिवासी असलेले व सध्या चरहाटा परिसरातील हॉटेल शिवमुद्राचे मालक अविनाश साबळे यांच्यावर काही जाती वादी गावगुंडांनी अचानक प्राण घातक हल्ला केला आरोपी संदीप दहिफळे सनी शिंदे व इतर लोकांनी मिळून हा हल्ला केला २६ /५ / २०२५ रोजी रात्री साडेनऊ ते साडेदहाच्या दरम्यान हॉटेल शिवमुद्रावर असताना हॉटेलच्या काउंटरवरती असलेली छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो पाहून हे महारा तुझी लायकी आहे का फोटो लावण्याची असे जाती व वाचक शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली.

गजानन दहिफळे यांनी मला असे शब्द सुनावले तुला उभे चिरून टाकेन तुझा बाप वाल्मीक कराड बाहेर येऊ दे तुला चिरुन टाकीन अशी धमकी दिली मग तुला दाखवतो व अक्षय साखरे यांनी हॉटेल काउंटरवर बसलो असता काउंटर च्या बाहेर खेचून माझ्या गचुऱ्याला धरून माझ्या गालात थापड मारून पोटामध्ये फायटर मारले तेव्हा माझा भाऊ नितीन यांनी पळत येऊन भांडण सोडवत असताना शनि शिंदे व गजानन दहिफळे यांनी हातातील लाकडी दांडक्याने माझ्या भावाला डोक्याला पाठीवर पायावर गंभीर स्वरूपाची दुखापत केली माझा भाऊ बेशुद्धपणे होऊ पर्यंत मारहाण करत होते व न नंतर माझ्या गल्ल्यातील ५० हजार रुपये रोख रक्कम ही त्यांनी घेऊन ते पसार झाले त्यानंतर मी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन गाठले व तिथे आरोपीचे विरोधात गुन्हा नोंद केला.



यावेळी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे क्रमांक कलम ११८ ( २) ११५ ( २) ३५२ ३५१ (२) ३५१( ३) ३(५) ३(२) औ गुन्हा दाखल झाला तरी अद्यापही आरोपींना अटक करण्यात आलेले नाही मग माणसाला जीव मारल्यानंतर पोलीस प्रशासनाला जाग येणार आहे का किंवा दुसरा संतोष देशमुख झाल्यावर प्रशासन जागे होईल का असा प्रश्न अविनाश साबळे यांनी उपस्थित केला आहे बीड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयाने याची दखल घ्यावी अशी मागणी करत त्यांनी आता पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर, मा. केंद्रीय गृहमंत्री नवी दिल्ली, मा, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई, मा. अध्यक्ष मानव अधिकार आयोग नवी दिल्ली यांना न्यायाच्या मागणीसाठी अर्ज पाठवले असून आता तरी न्याय मिळेल का अशी अपेक्षा ते कुटुंब सध्या विवंचनेत सापडले आहे.

# हजारो ठेवीदारांचे घरे उद्ध्वस्त करून ऐश करणारा महापापी बद्रीनारायण बाहेती अखेर पोलिसांच्या ताब्यात

## ठेवीदारांना करोडोचा चुना लावून फरार झालेल्या दामत्यास नांदेड पोलिसांकडून अटक

## ठेवीदार कृती समितीने नांदेडचे पोलीस अधीक्षक व तपास अधिकारी यांचे मानले आभार

परळी । प्रतिनिधी

राजधानी मल्टीस्टेटच्या माध्यमातून ठेवीदारांना जास्त व्याजाचे आमिष दाखवून जवळपास ३०० कोटी रुपये घेऊन पळून जाऊन अध्यक्ष चंदुलाल बियाणी व सचिव बद्रीनारायण बाहेती हे बीड पोलिसांना चिरीमिरी देऊन मज्जा करत होते. चंदुलाल बियाणी हा काही महिन्यापूर्वी अंबाजोगाई न्यायालयात शरण आला होता मात्र महापापी बद्रीनारायण बाहेती पोलिसांना सापडत नव्हता.गेल्या दोन वर्षात अनेक ठेवीदारांनी आत्महत्या केल्या तर हजारो ठेवीदारांचे घरे उध्वस्त झाले आहेत. याचे तीळमात्र सोयर सुतक नसलेला नीच वृत्तीचा बद्रीनारायण बाहेती मस्त ठेवीदाराच्या पैशावर मजा मारत फिरत होता.

मात्र काल नांदेड पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले आहे. मागील दोन वर्षापासून सतत थेटे मारत आरोपीचे सर्व डिटेल्स देऊन देखील बीडच्या पोलीस प्रशासनास राजधानी मल्टीस्टेट या एकाही फरार आरोपीस अटक केले नाही. परंतु जिल्ह्यात सर्वात कमी ठेवी असून देखील नांदेड पोलिसांनी एकाच भेटीमध्ये घटनेची गांभीरे पाहता आणि ठेवीदाराची व्यथा पाहून सर्वउत्तम कामगिरी केली आहे.





पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशावरून आर्थिक पुणे शाखेचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक एन.बी. कुंडगीर साहेब यांनी इचलकरंजी इथून आर्थिक गुन्हे शाखेची स्टीम सोबत घेऊन रातोरात राजस्थानी मल्टीस्टेट व पोदार स्कूलचा सचिव आणि या प्रकरणातील प्रमुख आरोपी असलेल्या बद्रीनारायणबाहेती व प्रेम लता बाहेतीस यांना अटक करून नांदेड येथील जिल्हा न्यायालयात हजर केले असता त्यांना आठ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

या सर्व उत्कृष्ट कामगिरी ठेवीदार प्रति समितीचे अध्यक्ष सेवकराम जाधव सर. यांच्या नेतृत्वात कृती समितीच्या शिष्टमंडळाने नांदेड येथील पोलीस अध्यक्ष कार्यालयात जाऊन एस पी अविनाश कुमार यांची भेट घेत त्यांचे व श्री कुंडगीर साहेबांचे आभार व्यक्त केले. यावेळी वेगवान मराठीची उपसंपादक पत्रकार केशव मुंडे, बाबासाहेब पंचांगे सर, मिलिंद शिरसागर, परमेश्वर दहिफळे, सुधीर देशमुख, साहेब नारायणराव झुंबर शेट, नंदकिशोर साबू हे ठेवीदाराची प्रतिनिधी उपस्थित होते.

# पहिल्यांदाच जून महिन्यात लिंबोडी तलाव ओव्हर फ्लो


आष्टी । प्रतिनिधी

मान्सूनपूर्व पावसाने 'मे' महिन्यातच वारंवार जोरदार हजेरी लावल्यामुळे यंदा जूनच्या पूर्वसंध्येलाच कड्यासह परिसरातील अनेक गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या लिंबोडी तलाव सोमवारी ओव्हर फ्लो झाला. जून महिन्यात आजवर पहिल्यांदाच तलाव भरल्याने शेतकऱ्यासह नागरिक समाधानी झाल्याचे दिसुन आले.



आष्टी तालुक्यातील कड्यासह परिसरातील अनेक गावांची तहान भागवणारा लिंबोडी तलाव हा आजपर्यंत लाभदायी ठरलेला आहे. यंदा मे महिन्यातच ठीकठिकाणी पावसाने जोरदार तडाखा दिल्यामुळे बऱ्यापैकी पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. तर जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बहुतांश ठिकाणी वादळी वाऱ्यासह मान्सून पावसाने हजेरी लावली. त्यामुळे तालुक्यातील ओढे, नाले, बंधारे अक्षरशः भरभरून वाहिले आहेत. पावसाने सर्वत्र मोठ्या प्रमाणात विक्रमी नोंद केली. आष्टी तालुक्यातील कड्यासह परिसरातील अनेक गावांना लाभदायी ठरणाऱ्या लिंबोडी तलाव सोमवारी ओव्हर फ्लो झाला आहे. अजून एक पाऊस झाला तर हा तलाव ओव्हरफ्लो होण्याची शक्यता आहे.

# क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेचे हुकूमशाही विरोधात धरणे आंदोलन




बीड । प्रतिनिधी

महावितरण कंपनीच्या अभियंता यांच्या मार्फत एकतर्फी व बेकायदेशीर लहू वाघमारे यांचे केलेले निलंबन रद्द करण्यासाठी महावितरण कार्यालय बीड समोर धरणे आंदोलन चालू आहे. सविस्तर माहिती अशी की महावितरण कर्मचारी श्री. लहु योगिराज वाघमारे व. तंत्रज्ञ भ.नि.नि.क्र.२७१०६७६ यांचे २०२३ च्या चर्हाटा या गावातील प्रा. आरोग्य केंद्रातील निवासस्थानाच्या विज कनेक्शन संबंधी खरे गुन्हेगार महावितरण चे वरिष्ठ अधिकारी यांना वाचविण्यासाठी ग्राऊंडलेवल च्या कर्मचार्याचे चुकीचे निलंबन आदेश काढुन बळी घेण्यात आला असल्याने सदर कर्मचारी यांच्या वर झालेला अन्याय दुर करून न्याय मिळण्यासाठी व खर्या गुन्हेगारांना शिक्षा व्हावी या मागणीसाठी महावितरण मधील लाईन स्टाफ कर्मचारी संघटना क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेने महावितरण च्या विभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन आज सुरू आहे.

# धारूर तालुक्यात यंदा २४ हजार हेक्टरवर कपाशी लागवड होण्याची शक्यता ?

## कापूस लागवडीने अधिक उताऱ्याची शेतकऱ्याला हमी तर सोयाबीन पेरणीसाठी काही भागात पावसाची प्रतिक्षा

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यात पावसाने काही ठिकाणी पेरणीयोग्य हजेरी लावली होती. या पावसावर जमिनीमध्ये काहीसा ओलावाही निर्माण झाला आहे. ओलावा असलेल्या जमिनीमध्ये शेतकऱ्यांनी कापूस पिकाची लागवड मागच्या दोन दिवसांपूर्वी पासून सुरू केली आहे तर तालुक्यातील काही भागात शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. तालुक्यात यावर्षी २४ हजार हेक्टरवर कपाशी लागवड होण्याचा अंदाज आहे. मृग नक्षत्राच्या पहिल्या परंतु पुन्हा जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने उघडीत दिल्याने मशागतीची कामे झाली शेतकऱ्यांनी मोठी धावपळ पेरणी होत असल्यामुळे शेतकरी मोठी धावपळ करताना दिसत होते. जून महिन्याच्या सुरुवातीलाच पाऊस होऊन वेळेवर खरिपाच्या पेरण्या होतील असे भाकीत हवामानतज्ज्ञ वर्तवत होते. मृग नक्षत्रात खरिपाची पेरणी झाल्यास पिकास चांगला उतारा येतो असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. यावर्षी मे महिन्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे जमिनीत ओलावा झाला होता,



मृग नक्षत्रात पाऊस होईल अशी अपेक्षा धरून बीबीयाने आणि खते खरेदी केले आहेत. परंतु तालुक्यातील काही भागात मागील दोन दिवसापासून पावसाने हजेरी लावली आहे.

यामुळे जमिनीत काहीसा ओलावा निर्माण झाला आहे. त्या ओलाव्यावरच आंबेवडगाव, गावंदरा, बोडखा, सोनीमोहा, जहागीरमोहा, गोपाळपूर, चोरंबा, अरणवाडी, चारदरी, घेटेगव्हाण या भागात शेतकऱ्यांनी कपाशी लागवड सुरू केली आहे. गुरुवारी दुपारनंतर तर शुक्रवारी दिवसभर कपाशीची लागवड झाली. परंतु तांदळवाडी, गांजपूर चिंचपूर, या गावात ओलावा निर्माण झाल्यास शेतकरी सोयाबीन पिकाची पेरणी करतात. कापसाप्रमाणेच सोयाबीनचे क्षेत्र ही तालुक्यात मोठ्या प्रमाणात आहे परंतु सुरुवातीला शेतकऱ्यांनी डोंगरपट्ट्यातील काही भागात कापाशीची लागवड सुरू केली आहे. मैंदवाडी, धारूर शिवार, खोडस या मोहखेड, रुई धारूर, अंजनडोह, खोडस, वाघोली याभागात शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे जमिनीत चांगला ओलावा आला. शेतकरी मृग नक्षत्रात पेरणी कशी केली यासाठी धावपळ करताना दिसत होते. तर काही भागांमध्ये पाऊस न झाल्यामुळे शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

**नगदीच पीक कापूस, सोयाबीन असल्याने शेतकऱ्यांचा अधिकचा कल**

मागच्या दोन दिवसापासून दिवसभर ग्रामीण भागात शुकशुकाट होता. शेतक-यांनी कापुस लागवडीसाठी मिळेल त्या भावामध्ये मजुरांकडून कापसाची लागवड केली. मजुरांना चारशे रुपये पर्यंत कापूस लागवडीची मजुरी भाव होता. महिलांसाठी चारशे रुपये तर बैलजोडी साठी दीड हजार रुपयापर्यंत रोजगार देण्यात येत आहे यावर्षी काही भागात पेरणी योग्य पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस पिकाची लागवड सुरू केली आहे. त काही भागात आणखी दमदार पाऊस झाल्या नंतर शेतकरी सोयाबीन पिकाची पेरणी करतात कापूस व सोयाबीन हे नगदी पीक असल्यामुळे शेतकरी या पिकांची जास्त लागवड व पेरणी करतो त्यामुळे याहीवर्षी मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग कापुस, सोयाबीन कडे अधिकचा वळला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT